मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# आपत्ती व्यवस्थापनात समन्वय, तत्परता आणि पूर्वतयारीला प्राधान्य द्या : अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम

## आपत्कालीन परिस्थिती प्रभावीपणे हाताळण्यासाठी विभागनिहाय नियोजन, मनुष्यबळ व्यवस्थापन आणि यंत्रणा सज्ज ठेवण्याचे निर्देश

**पिंपरी | प्रतिनिधी**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर संभाव्य आपत्कालीन परिस्थितीचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांच्या अध्यक्षतेखाली आपत्ती व्यवस्थापन आढावा बैठक पार पडली. नागरिकांच्या जीवित व मालमत्तेचे संरक्षण हे प्रशासनाचे सर्वोच्च प्राधान्य असून, कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत सर्व विभागांनी समन्वयाने व तत्परतेने कार्य करावे, असे निर्देश यावेळी त्यांनी दिले.



यावेळी अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम म्हणाले की, आपत्ती व्यवस्थापनात पूर्वतयारी, प्रभावी समन्वय आणि तातडीचा प्रतिसाद ही यशस्वी व्यवस्थापनाची प्रमुख सूत्रे आहेत. प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाने उपलब्ध मनुष्यबळाचे योग्य नियोजन करून आपत्कालीन परिस्थितीत त्वरित प्रतिसाद देण्यासाठी सज्ज राहावे. क्षेत्रीय अधिकारी आणि कार्यकारी अभियंते यांनी सातत्याने समन्वय ठेवून क्षेत्रातील परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवावे. क्विक रिस्पॉन्स टीम (QRT) कार्यरत ठेवणे ही प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाची प्राथमिक जबाबदारी असून, कोणतीही आपत्कालीन माहिती प्राप्त होताच तात्काळ घटनास्थळी पोहोचून आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

संभाव्य पूरस्थिती लक्षात घेऊन शहरातील सखल भागांची नियमित पाहणी करून तेथील नागरिकांना वेळोवेळी सतर्क करावे. सुरक्षित ठिकाणी निवारा केंद्रांची निवड करून ती शाळा किंवा अन्य सार्वजनिक इमारतींमध्ये उभारावीत. निवारा केंद्रांमध्ये स्वच्छता, पिण्याचे पाणी, वीज, स्वच्छतागृहे तसेच इतर आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध असल्याची खात्री करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

आरोग्य व वैद्यकीय विभागाने क्षेत्रनिहाय स्वतंत्र वैद्यकीय पथके स्थापन करून आवश्यक औषधसाठा, वैद्यकीय साहित्य व मनुष्यबळ उपलब्ध ठेवावे. पुनर्वसनासाठी आवश्यक वाहने कायम सज्ज ठेवावीत. पाणी साचणाऱ्या भागांमध्ये तात्काळ पाण्याचा उपसा करण्यासाठी आवश्यक क्षमतेचे पंप कार्यरत स्थितीत ठेवण्याचे निर्देशही त्यांनी संबंधित विभागांना दिले.

धोकादायक ठिकाणी तातडीने कारवाई करता यावी यासाठी स्थापत्य विभागाने आवश्यक त्या ठिकाणी जेसीबी यंत्रसामग्री उपलब्ध ठेवावी. तसेच आपत्ती व्यवस्थापनाच्या कामात 'आपदा मित्र' स्वयंसेवक पथकाशी सातत्याने समन्वय ठेवून त्यांचा प्रभावी सहभाग सुनिश्चित करावा. सर्व विभागांनी आपापल्या जबाबदाऱ्यांनुसार पूर्वतयारी पूर्ण करून कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना तातडीने मदत उपलब्ध करून देण्यासाठी यंत्रणा चोवीस तास सज्ज ठेवाव्यात, असेही अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनी सांगितले.

बैठकीस मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सह शहर अभियंते अजय सूर्यवंशी व अनिल भालसाखळे, उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, अण्णा बोदडे, व्यंकटेश दुर्वास, सीताराम बहुरे, राजेश आगळे, क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील, निवेदिता घार्गे, परशुराम वाघमोडे, अजिंक्य येळे, पूजा दुधनाळे, गोरख लिमन, मुकेश कोळप, सहाय्यक आयुक्त उमा दर्वेश, मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, विशेष अधिकारी किरण गायकवाड, सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे, अमित पंडित, मुख्य पशुसंवर्धन अधिकारी डॉ. अरुण दगडे, डॉ. अंजली नलावडे यांच्यासह कार्यकारी अभियंते तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# शालेय वाहनांवर वाहतूक पोलिसांचा धडक ॲक्शन; 69 वाहनांवर कारवाई

## चार दिवसांच्या विशेष मोहिमेत 181 वाहनांची तपासणी; नियमभंग करणाऱ्यांकडून 3.76 लाखांचा दंड वसूल

**पुणे | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या वाहतूक शाखेने शालेय विद्यार्थ्यांची ने-आण करणाऱ्या वाहनांवर विशेष मोहीम राबवत धोकादायक पद्धतीने वाहतूक करणाऱ्या वाहनचालकांविरोधात कारवाई केली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत ही संयुक्त विशेष मोहीम राबविण्यात आली.



### चार दिवसांची विशेष मोहीम

» पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या वाहतूक शाखेने २९ जून, ३० जून, २ जुलै आणि २० जुलै २०२६ रोजी शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर विशेष तपासणी मोहीम राबवली. या मोहिमेत वाहतूक शाखा, प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) आणि संबंधित विभागांच्या संयुक्त पथकांनी सहभाग घेतला. वाकड, सांगवी, भोसरी, चिंचवड, तळवडे आणि हिंजवडी परिसरात वाहनांची तपासणी करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत नियमांचे काटेकोर पालन होत आहे की नाही, याची पाहणी करण्यात आली.

पोलिस आयुक्तालयाच्या निर्देशानुसार वाहतूक शाखा, प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) आणि संबंधित विभागांच्या संयुक्त पथकांनी २९ जून, ३० जून, २ जुलै आणि २० जुलै २०२६ रोजी विविध भागांत तपासणी मोहीम हाती घेतली. या मोहिमेत वाकड, सांगवी, भोसरी, चिंचवड, तळवडे आणि हिंजवडी वाहतूक विभागांच्या हद्दीत शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांची तपासणी करण्यात आली. या चार दिवसांच्या मोहिमेदरम्यान एकूण १८१ वाहनांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ६९ वाहनांवर कारवाई करण्यात आली. संबंधित वाहनचालकांकडून ३ लाख ७६ हजार ९०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

ही कारवाई पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे, सह पोलिस आयुक्त शशिकांत महावर, अतिरिक्त पोलिस आयुक्त वसंत परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. वाहतूक शाखेचे पोलिस उपायुक्त विक्रांत देशमुख यांच्या नेतृत्वाखाली संबंधित वाहतूक विभागांचे अधिकारी व अंमलदार यांनी मोहिमेत सहभाग घेतला. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेशी तडजोड करणाऱ्या वाहनचालकांवर यापुढेही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचा इशारा वाहतूक पोलिसांनी दिला आहे.

# महाराजस्व शिबिरा'तून शिवरायांच्या विचारांची प्रत्यक्षात अंमलबजावणी : आमदार शंकर जगताप

## चिंचवडमध्ये 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' उत्साहात, 3,225 नागरिकांना शासकीय सेवांचे थेट वाटप

**पिंपरी | प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांनी लोककल्याणकारी राज्यव्यवस्थेचा आदर्श आपल्यासमोर ठेवला आहे. प्रशासन हे केवळ कार्यालयात बसून चालणारे नसावे, तर ते सर्वसामान्य नागरिकांच्या दारापर्यंत पोहोचले पाहिजे, हीच शिवरायांची शिकवण आहे. 'रयतेच्या भाजीच्या देठालाही हात लावता कामा नये' या सूत्राप्रमाणे स्वराज्यातील शेवटच्या घटकाचे हित जपणे हेच आपले मुख्य कर्तव्य असून, याच विचारांतून नागरिकांना सन्मानाने त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी 'महाराजस्व समाधान शिबिरा'चे आयोजन करण्यात आले आहे," असे प्रतिपादन चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांनी बुधवारी केले.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून चिंचवड मतदारसंघातील आहेर मंगल कार्यालय येथे "छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर' अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या माध्यमातून एकाच छताखाली विविध शासकीय सेवा, दाखले आणि पेन्शन योजनांचे लाभ ३,२२५ गरजूंना थेट वितरीत करण्यात आले.महापालिका उपायुक्त अण्णा बोदडे, उपविभागीय अधिकारी (हवेली) डॉ. यशवंत माने, अपर तहसीलदार डॉ. जयराज देशमुख, नायब तहसीलदार डॉ. मनीषा माने-लोंढे, मुळशीचे तहसीलदार विनयकुमार चौबे, अन्नपुरवठा अधिकारी विजयकुमार क्षीरसागर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, माजी महापौर तथा नगरसेविका अपर्णा डोके, नगरसेवक कुणाल वाव्हळकर, नगरसेविका आशाताई सूर्यवंशी, पल्लवीताई वाल्हेकर, मनीषाताई पवार, मनीषाताई चिंचवडे, कोमलताई काळे, सरचिटणीस मधुकर बच्चे, तसेच बिभीषण चौधरी, काळूराम बारणे, सिद्धेश्वर बारणे, तानाजी बारणे, सचिन चिंचवडे, सुधीर वाल्हेकर, गोपाळ माळेकर, आदिती निकम यांच्यासह प्रशासकीय अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिबिरादरम्यान बोलताना आमदार शंकर जगताप म्हणाले, "भारतीय जनता पार्टीचा मूळ विचार 'अंत्योदय' हाच आहे. समाजातील शेवटच्या रांगेत उभ्या असलेल्या घटकाचा विकास हाच खरा विकास मानून आम्ही 'आमदार आपल्या दारी' व 'शासन आपल्या दारी' या संकल्पनेतून थेट नागरिकांपर्यंत पोहोचत आहोत. आज महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या माध्यमातून एकाच छताखाली १५ पेक्षा जास्त महसुली व नागरी सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. ७/१२ दुरुस्ती, फेरफार नोंदी, तसेच संजय गांधी निराधार योजनेच्या माध्यमातून लाभार्थ्यांना थेट मदत मिळवून दिली आहे. याशिवाय तुकडेबंदी कायदा व पट्टावाटपाच्या निर्णयांमुळे पिंपरी-चिंचवड आणि प्राधिकरणातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे."



### पिंपरी-चिंचवडमध्ये स्वतंत्र महसूल कार्यालयाची मागणी

» पिंपरी-चिंचवड शहराचा वेगाने होणारा विस्तार पाहता नागरिकांना प्रशासकीय कामांसाठी पुण्याची किंवा दूरच्या कार्यालयांची वारी करावी लागू नये, यासाठी स्वतंत्र महसूल व्यवस्था उभारणीचा पाठपुरावा सुरू असल्याचे आमदार जगताप यांनी स्पष्ट केले. मुळशी व हवेली तालुक्यांत विखुरलेली कार्यालये चिंचवडमध्येच आणून तहसील कार्यालय, संजय गांधी निराधार योजना कार्यालय, कृषी कार्यालय व अन्नपुरवठा कार्यालय प्रत्येक विधानसभानिहाय स्वतंत्र व्हावे, अशी ठाम मागणी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

### विद्यार्थी, महिला व ज्येष्ठांसाठी विशेष सोयी

» या शिबिरात अपंग, विधवा महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी 'श्रावण बाळ योजना' आणि वैद्यकीय उपचारांसाठी ५ लाखांपर्यंतचे 'आयुष्यमान भारत कार्ड' तत्काळ काढून देण्याची विशेष व्यवस्था करण्यात आली होती. तसेच तरुण विद्यार्थ्यांची धावपळ थांबवण्यासाठी डोमिसाईल, राष्ट्रीयत्व, उत्पन्नाचे दाखले, तलाठी दाखले व मंडल अधिकारी अहवाल एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आले.

### आजच्या शिबिरातील योजना व लाभार्थी संख्या

- आयुष्यमान भारत कार्ड: ७७२
- आभा योजना कार्ड: ४९२
- S.I.R.: ४३०
- रेशनकार्ड सही अर्ज:२७३
- तलाठी उत्पन्न दाखले: २०८
- संजय गांधी निराधार योजना (मंजुरी व पेन्शन): २०८
- शालेय उत्पन्न दाखले:१९२
- नवीन रेशनकार्ड वाटप: ११५
- नोंदणी व मुद्रांक विभाग सेवा: १०७
- आवास योजना लाभ: ७७
- ज्येष्ठ नागरिक ओळखपत्र: ७५
- नॉन-क्रिमिनल प्रमाणपत्र:६१
- डोमिसाईल दाखले: ४९
- संजय गांधी नवीन मंजुरी पत्र वाटप:४५
- रक्तदान शिबीर सहभाग:४२
- जातीचे दाखले:३२
- आधार कार्ड दुरुस्ती/सेवा:२५
- नवीन मंजुरीसाठी संजय गांधी अर्ज:२२

(एकूण लाभार्थी: ३,२२५)

# चिखली येथील गुरुवर्य अकॅडमी स्कूलमध्ये 'शैक्षणिक वारी' उत्साहात संपन्न

## गुरुवर्य अकॅडमी स्कूलचा अभिनव उपक्रम; वारकरी परंपरेतून रस्ता सुरक्षा, पर्यावरण, जलसंवर्धन व डिजिटल सुरक्षेबाबत जनजागृती

**पिंपरी | प्रतिनिधी**

गुरुवर्य अकॅडमी स्कूल येथे 'शैक्षणिक वारी २०२६-२७' उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. ही वारी शाळेपासून ते विठ्ठल मंदिर, टाळगाव चिखलीपर्यंत मोठ्या दिमाखात काढण्यात आली. वारकरी परंपरा आणि शिक्षणाचा सुंदर संगम साधत विद्यार्थ्यांनी या वारीच्या माध्यमातून समाजाला विविध सामाजिक विषयांवर जनजागृतीचा प्रभावी संदेश दिला.

वारीदरम्यान विद्यार्थ्यांनी टाळ-मृदुंग, अभंग आणि विठ्ठलाच्या नामघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला. ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांनी या शैक्षणिक वारीत उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत रस्ता सुरक्षा, प्लास्टिकमुक्त भारत, वृक्षसंवर्धन, जलसंवर्धन, प्रदूषणमुक्त पर्यावरण, पर्यावरण संरक्षण, वीज बचत, डिजिटल सुरक्षा, आरोग्य हीच खरी संपत्ती, अन्न सुरक्षा आणि जागतिक तापमानवाढ यांसारख्या महत्त्वाच्या आणि संवेदनशील विषयांवर समाजाचे लक्ष वेधून घेतले.



या सोहळ्यास नगरसेवक विकासभाऊ साने, विनायक आबा मोरे आणि नगरसेविका सोनमताई मोरे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले.

विद्यार्थ्यांनी वारकरी नृत्य आणि विठ्ठल भक्तीगीते सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच विद्यार्थ्यांनी साहसी व मर्दानी खेळांची रोमहर्षक प्रात्यक्षिके सादर करत उपस्थितांची वाहवा मिळवली.



या कार्यक्रमाला शाळेचे संचालक भूषण मावळे, मुख्याध्यापिका ज्योत्स्ना मावळे, समन्वयक मोहना मॅडम व प्रतिभा मॅडम यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. वैशाली अरगडे यांनी आभार मानले.

"ज्ञानाची वारी करूया, शिक्षणाचा दीप प्रज्वलित करूया" या प्रेरणादायी संदेशासह पार पडलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, पर्यावरण संवर्धन, आरोग्य जागरूकता कर्तव्यभावना अधिक दृढ झाली.तालुक्यातील बहुतांश धरणे ही तुडुंब भरली आहेत. पावसाचा जोर कायम राहिल्यास धरणांमधून पाण्याचा विसर्ग पाटबंधारे विभागाकडून केला जाऊ शकतो त्यामुळे नागरिकांनी सतर्क रहावे व काळजी घ्यावी.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्थायी समिती सभेत विकासकामे आणि नागरिकाभिमुख निर्णयांना मंजुरी

## महसूलवाढ, दर्जेदार नागरी सुविधा आणि नागरिकहिताला प्राधान्य देत शहराच्या सर्वांगीण विकासासाठी स्थायी समिती कटिबद्ध – सभापती अभिषेक बारणे

**पुणे | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा आज स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. सभेमध्ये शहराच्या महसूलवाढीस चालना देणारे निर्णय, पायाभूत सुविधा, आरोग्य सेवा, पर्यावरण संवर्धन, माहिती तंत्रज्ञान, समाजकल्याण, शिक्षण तसेच विविध नागरी सुविधांशी संबंधित महत्त्वाच्या विषयांना मंजुरी देण्यात आली.



सभेत शहरातील ८० उड्डाणपूल व भुयारी मार्गांवरील जाहिरात हक्क १० वर्षांच्या कालावधीसाठी ई-लिलावाद्वारे देण्यास मंजुरी देण्यात आली. यामुळे महापालिकेला दीर्घकालीन उत्पन्न मिळणार असून दरवर्षी ग्राहक किंमत निर्देशांकानुसार (CPI) महसूलात वाढ होणार आहे. तसेच शहरातील १८ मीटर व त्यापेक्षा अधिक रुंदीच्या रस्त्यांवरील दिशादर्शक फलकांवरील जाहिरात हक्क पाच वर्षांसाठी देण्यासही मंजुरी देण्यात आली. या दोन्ही निर्णयांमुळे महापालिकेच्या कायमस्वरूपी महसूल स्रोतांमध्ये लक्षणीय वाढ होणार आहे.

महापालिकेच्या सर्व विभागांतील संगणक प्रणालीची देखभाल व दुरुस्ती अखंडित सुरू राहण्यासाठी नवीन एजन्सीची नियुक्ती होईपर्यंत विद्यमान एजन्सीला मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील शवागारातील कोल्ड स्टोरेजसाठी वार्षिक देखभाल व दुरुस्ती (AMC) मंजूर करण्यात आली. तसेच महापालिकेच्या विविध रुग्णालयांमध्ये रुग्णवाहिका सेवा व इतर वैद्यकीय कामकाज सुरळीत ठेवण्यासाठी कंत्राटी पद्धतीने ३७ वाहनचालक उपलब्ध करून देण्यास मंजुरी देण्यात आली. या निर्णयामुळे नागरिकांना अधिक सक्षम आणि कार्यक्षम आरोग्य सेवा उपलब्ध होणार आहे.

प्रभाग क्रमांक १० मधील संभाजीनगर येथे स्टॉर्म वॉटर लाईन उभारणीच्या कामास मंजुरी देण्यात आली. तसेच अर्बन स्ट्रीट डिझाईन संकल्पनेत विकसित करण्यात आलेल्या पदपथांच्या देखभाल व दुरुस्तीची कामे हाती घेण्यास मान्यता देण्यात आली. यामुळे शहरातील पादचारी सुविधा अधिक सुरक्षित आणि सुस्थितीत राहणार आहेत.

एचआयव्ही/एड्स बाधित नागरिकांना पीएमपीएमएलच्या मोफत बस पास योजनेसाठी आवश्यक निधीस मंजुरी देण्यात आली. यामुळे पात्र लाभार्थ्यांना प्रवासाची सुविधा कायम राहण्यास मदत होणार आहे.

महापालिकेच्या उर्दू माध्यम बालवाडीतील विद्यार्थ्यांसाठी मूलभूत शिक्षणासाठी आवश्यक लेखन साहित्य खरेदीवरील खर्चाचे अवलोकन करण्यात आले.

प्रभाग क्रमांक १८, चिंचवड येथील विकास आराखड्यातील मिसिंग लिंक व इतर रस्ते विकसित करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करण्यास मंजुरी देण्यात आली. या निर्णयामुळे परिसरातील वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यास मदत होणार आहे.

चऱ्होली येथील मैलाशुद्धीकरण केंद्रांच्या संचालन, देखभाल व दुरुस्तीच्या कामांना मंजुरी देण्यात आली. तसेच नवीन 'ज' (लोहगड) व 'ल' (रायगड) क्षेत्रीय कार्यालयांसाठी आवश्यक कार्यालयीन फर्निचर खरेदीस कार्योत्तर मान्यता देण्यात आली.

प्रभाग क्रमांक ११, १२ तसेच 'ड' क्षेत्रीय कार्यालयातील जलनिःसारण नलिका, चेंबर्स व संबंधित देखभाल-दुरुस्तीची विविध कामे मंजूर करण्यात आली. या निर्णयांमुळे शहरातील जलनिःसारण व्यवस्था अधिक सक्षम होणार आहे.

अग्निशामक विभागासाठी स्मार्ट गार्ड कटर उपकरण खरेदीस मंजुरी देण्यात आली. यामुळे आपत्कालीन बचावकार्य अधिक प्रभावी व जलदगतीने करता येणार आहे.

बीआरटी कॉरिडॉर क्रमांक ३ वरील रेलिंग दुरुस्ती तसेच बीआरटी बसथांब्यांच्या वार्षिक देखभाल-दुरुस्तीच्या कामांनाही मंजुरी देण्यात आली.

पर्यावरणपूरक वाहतुकीला प्रोत्साहन देण्यासाठी पारंपरिक इंधनावरील रिक्षांचे अधिकृतपणे ई-रिक्षामध्ये रूपांतर (रेट्रोफिटमेंट) करणाऱ्या रिक्षाचालकांना आर्थिक सहाय्य देण्याबाबतचा प्रस्ताव महापालिका सभेकडे शिफारस करण्याचा निर्णय घेण्यात आला.

दापोडी येथील नागरिकांच्या सोयीसाठी नवीन तलाठी कार्यालयासाठी महापालिकेची जागा भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्याची शिफारस महापालिका सभेकडे करण्यात आली.

तसेच खासगी गृहनिर्माण प्रकल्पांमधील मैलाशुद्धीकरण केंद्रांतील प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुनर्वापर वाढविणे आणि उर्वरित पाण्यासाठी जलनिःसारण जोडणीसंदर्भातील धोरणात्मक प्रस्तावालाही मान्यता देण्यात आली.

### अजितदादांच्या आठवणींना उजाळा

» "थोर व्यक्तींनी केलेल्या व्यापक सामाजिक कार्याबद्दल, योगदानाबद्दल त्यांचे पश्चात त्यांची जयंती साजरी करण्यात येते,महाराष्ट्र शासनाने राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची जयंती सर्व शासकीय कार्यालयात साजरी करण्याचा नुकताच निर्णय घेतला आहे. दिवंगत अजितदादांचे पिंपरी-चिंचवड शहराच्या जडणघडणीत महत्त्वपूर्ण योगदान असून त्यांच्या अकस्मात जाण्यामुळे मोठी पोकळी निर्माण झाली आहे असे प्रतिपादन स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी केले.आजच्या सभेत स्थायी समिती सदस्य विकास साने, बाबासाहेब त्रिभुवन,सुलभा उबाळे,शालिनीताई गुजर यांनी देखील अजितदादांच्या आठवणींना उजाळा दिला.

**“महापालिकेच्या महसूलवाढीस चालना देणारे, शहरातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम करणारे, आरोग्य सेवा बळकट करणारे, पर्यावरण संवर्धनाला प्रोत्साहन देणारे आणि नागरिकांना अधिक दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देणारे महत्त्वाचे निर्णय आजच्या सभेत घेण्यात आले. विकासकामांमध्ये पारदर्शकता, गुणवत्ता आणि नागरिकहित यांना सर्वोच्च प्राधान्य देत पिंपरी-चिंचवडच्या सर्वांगीण विकासासाठी स्थायी समिती कटिबद्ध आहे.”"**

**- अभिषेक बारणे, सभापती – स्थायी समिती, पिंपरी चिंचवड महापालिका.**

# फ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत नाल्यावरील अनधिकृत बांधकामावर कारवाई; नाल्यामधील पाइप काढून संपूर्ण नाला खुला

## सर्व क्षेत्रीय कार्यालयांमध्ये नालेसफाईची मोहीम राबवून पाण्याचा प्रवाह सुरळीत राहावा यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आयुक्तांचे निर्देश

**पुणे | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने ज्ञान प्रबोधिनी शाळा, मोरे वस्ती, गणेश नगर परिसरातील नाल्यावर करण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामावर निष्कासनाची कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान नाल्यामध्ये टाकण्यात आलेले अनधिकृत पाइप काढून टाकण्यात आले असून संपूर्ण नाला खुला करण्यात आला आहे. त्यामुळे पावसाळ्यात पाण्याचा नैसर्गिक प्रवाह सुरळीत होण्यास मदत होणार आहे.



ही कारवाई फ क्षेत्रीय कार्यालयाचे क्षेत्रीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त अतुल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईदरम्यान उपअभियंता हेमंत घोड, कनिष्ठ अभियंता कुंभार, अतिक्रमण निरीक्षक गणेश तीकोणे, बीट निरीक्षक प्रफुल भोकरे, साईनाथ देसाई, ऐश्वर्या मासाळ तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

कारवाईसाठी अतिक्रमण विभागाचे ५ पोलीस कर्मचारी, महाराष्ट्र सुरक्षा बलाचे १७ जवान आणि महानगरपालिकेचे ५ मजूर सहभागी झाले होते. सदर कारवाईसाठी २ जेसीबी यंत्रांचा वापर करण्यात आला.

महानगरपालिकेकडून पावसाळ्यात पाण्याचा नैसर्गिक प्रवाह अबाधित ठेवण्यासाठी नाले, ओढे व जलवाहिन्यांवरील अनधिकृत अतिक्रमणांविरुद्ध अशाच प्रकारच्या कारवाया पुढेही सातत्याने सुरू राहणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

**“पावसाळ्यात नाल्यांमधील पाण्याचा नैसर्गिक प्रवाह सुरळीत राहावा, यासाठी शहरातील सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना नालेसफाई आणि नाल्यांवरील अडथळे दूर करण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. त्याअंतर्गत ही कारवाई करण्यात आली असून अशी मोहीम इतर क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीतही सातत्याने राबविण्यात येणार आहे. नागरिकांनी नाल्याच्या प्रवाहात अडथळा निर्माण होईल अशा प्रकारे अनधिकृतपणे पाइप किंवा इतर कोणतेही बांधकाम करू नये. नागरिकांच्या सहकार्यामुळेच पावसाळ्यात पूरस्थिती टाळण्यास आणि शहरातील जलनिस्सारण व्यवस्था सक्षम ठेवण्यास मदत होईल.”**

**- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.**

# मोशी कचरा डेपो दुर्घटना : मृतांच्या वारसांना आर्थिक मदत वितरणाची प्रक्रिया वेगाने सुरू...

## सन्नी माने, राहुल गायकवाड व वामन कसबे यांच्या वारसांच्या खात्यात मदतीची 10 लाख रुपये रक्कम जमा; उर्वरित लाभार्थ्यांची प्रक्रिया अंतिम टप्प्यात..

**पुणे | प्रतिनिधी**

मोशी येथील कचरा डेपोमध्ये ८ जुलै रोजी झालेल्या दुर्घटनेत मृत्यू झालेल्या ९ नागरिकांच्या कायदेशीर वारसांना प्रत्येकी १० लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून युद्धपातळीवर सुरू आहे. महापौर रवि लांडगे यांच्या निर्देशानुसार आवश्यक प्रशासकीय कार्यवाही तातडीने हाती घेण्यात आली असून, कागदपत्रांची पूर्तता झालेल्या लाभार्थ्यांच्या खात्यात आर्थिक मदतीची रक्कम थेट जमा करण्यात येत असल्याची माहिती आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिली.



याअंतर्गत मृत सन्नी माने यांच्या कायदेशीर वारसांना एकूण १० लाख रुपयांची आर्थिक मदत प्रदान करण्यात आली असून, त्यांच्या पत्नी कांचन सन्नी माने यांच्या खात्यात ५ लाख रुपये, तर आई संगीता अशोक माने यांच्या खात्यात ५ लाख रुपये जमा करण्यात आले आहेत. तसेच मृत राहुल गायकवाड यांच्या कायदेशीर वारसांना एकूण १० लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली असून, त्यांच्या पत्नी अश्विनी राहुल गायकवाड यांच्या खात्यात ५ लाख रुपये, तर आई संपता गायकवाड आणि वडील धोंडीराम गायकवाड यांच्या खात्यात प्रत्येकी २.५० लाख रुपये जमा करण्यात आले आहेत. याशिवाय मृत वामन कसबे यांच्या कायदेशीर वारस असलेल्या त्यांच्या पत्नी सुनीता वामन कसबे यांच्या खात्यात १० लाख रुपयांची आर्थिक मदत जमा करण्यात आली आहे.

यापूर्वी मृत अक्षय सावंत यांच्या कायदेशीर वारसांच्या आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांच्या खात्यातही नियमानुसार १० लाख रुपयांची आर्थिक मदत जमा करण्यात आली आहे.

दुर्घटनेत मृत्यू झालेल्या भावेश वाणी, सुनील कोरके, महेश कुंभार, नागेश गायकवाड आणि रणजीत पाटील यांच्या कायदेशीर वारसांच्या कागदपत्रांची पडताळणी व आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून, ती पूर्ण होताच त्यांच्या खात्यातही नियमानुसार आर्थिक मदतीची रक्कम थेट जमा करण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिली.

> **मोशी कचरा डेपो दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबीयांना तातडीने आर्थिक मदत उपलब्ध करून देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी प्राधान्याने करण्यात येत आहे. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता होताच पात्र वारसांच्या खात्यात आर्थिक मदतीची रक्कम थेट जमा केली जात आहे. उर्वरित लाभार्थ्यांची प्रक्रियाही अंतिम टप्प्यात असून ती लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल. बाधित कुटुंबांना या कठीण प्रसंगी सर्वतोपरी सहकार्य करण्यासाठी महानगरपालिका कटिबद्ध आहे.**
>
> **- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.**

> **मोशी दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबीयांना तातडीने दिलासा मिळावा, ही महानगरपालिकेची भूमिका आहे. कोणत्याही पात्र लाभार्थ्याला आर्थिक मदतीसाठी प्रतीक्षा करावी लागू नये, यासाठी प्रशासनाला त्वरित कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सर्व पात्र वारसांना नियमानुसार आर्थिक मदत उपलब्ध करून दिली जाईल.**
>
> **- रवि लांडगे, महापौर, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.**

# विश्रांतवाडी, विमानतळ, खराडीत पाणी बंद, जलवाहिनी स्थलांतरासह अन्य दुरुस्तीची कामे

## पुणे शहर ते पुरंदर विमानतळामधील अंतर आणि प्रवासाचा वेळ दोन्ही कमी होणार असून, या भुयारी मार्गातून रस्ता आणि मेट्रो नेण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

जागतिक बँकेच्या मुख्य जलवाहिनीच्या स्थलांतराचे काम आणि होळकर जलशुद्धीकरण केंद्रातील विद्युत यंत्रणेची दुरुस्ती तसेच गळती काढण्याची कामे एकाच वेळी पिंपरी-चिंचवडमधील निगडी भक्ती-शक्ती चौक येथे करण्यात येणार आहे.



या भागात राहणार पाणी बंदबंडगार्डन विभाग : म्हस्के वस्ती, गणेशनगर (बोपखेल), कळस माळवाडी, जाधववस्ती, विश्रांतवाडीचा काही भाग, संजय पार्क, बर्माशेल परिसर, पुणे विमानतळ परिसर तसेच खराडीचा काही भाग. हरी गंगा टाकीवरून पाणीपुरवठा होणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोसायटी, अहिल्यानगर, स्वातंत्र्य सैनिक नगर, हरीगंगा सोसायटी, माप्रेस, समाजकल्याण वसतिगृह, विश्रांतवाडी पोलीस लाइन, आरोग्य भवन, शांतीनगर, भारतनगर, कतारवाडी, प्रतिकनगर, जेसिडी पार्क, वृंदावन सोसायटी, उत्तम टाऊनशिप, मित्तल सोसायटी, ड्रीम सोसायटी, जाधवनगर, पंचशीलनगर, श्रमिकनगर, कामगारनगर आणि चंद्रमानगर. चतु:श्रृंगी विभागांतर्गत खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाचा परिसर, अॅम्युनिशन फॅक्टरी, मुळा रोड परिसर आणि भोईटे वस्ती.

यामुळे पुणे महापालिकेच्या बंडगार्डन पाणीपुरवठा विभागांतर्गत येणाऱ्या अनेक भागांचा पाणीपुरवठा गुरुवारी (दि. २३) पूर्णपणे बंद राहणार आहे.

शुक्रवारी (दि. २४) संबंधित भागांमध्ये पाणीपुरवठा उशिराने आणि कमी दाबाने होण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन लष्कर पाणीपुरवठा विभागाचे प्रभारी अधीक्षक अभियंता यांनी केले आहे.

### या भागात राहणार पाणी बंद

**» बंडगार्डन विभाग : म्हस्के वस्ती, गणेशनगर (बोपखेल), कळस माळवाडी, जाधववस्ती, विश्रांतवाडीचा काही भाग, संजय पार्क, बर्माशेल परिसर, पुणे विमानतळ परिसर तसेच खराडीचा काही भाग. हरी गंगा टाकीवरून पाणीपुरवठा होणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोसायटी, अहिल्यानगर, स्वातंत्र्य सैनिक नगर, हरीगंगा सोसायटी, माप्रेस, समाजकल्याण वसतिगृह, विश्रांतवाडी पोलीस लाइन, आरोग्य भवन, शांतीनगर, भारतनगर, कतारवाडी, प्रतिकनगर, जेसिडी पार्क, वृंदावन सोसायटी, उत्तम टाऊनशिप, मित्तल सोसायटी, ड्रीम सोसायटी, जाधवनगर, पंचशीलनगर, श्रमिकनगर, कामगारनगर आणि चंद्रमानगर. चतु:श्रृंगी विभागांतर्गत खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाचा परिसर, अॅम्युनिशन फॅक्टरी, मुळा रोड परिसर आणि भोईटे वस्ती.**